Literacy for a Billion

Movie: Mukkam Post Dhebewadi
Year: 1969

Song: Hirvya Madicha Jina Avghad
Lyricist: Ga. Di. Madgulkar

हिरव्या माडीचा जिना अवघड
हां
हिरव्या माडीचा जिना अवघड
जिना अवघड
बरं मग पुढं
आरं नको येऊ
का
नको येऊ होईल परवड रं
नको येऊ होईल परवड
हिरव्या माडीचा जिना अवघड गं बाई
हिरव्या माडीचा जिना अवघड
जिना अवघड
नको येऊ होईल परवड रं
नको येऊ होईल परवड

हिरव्या माडीत गोरी मैना
उभी हातात घेऊन आईना
हिरव्या माडीत गोरी मैना
अशी हासंल उडवून नैना
नको बघू उगा तिचकडं रं
नको बघू उगा तिचकडं
सोंग सोन्याचं घरी बेगडं
जिना अवघड
नको येऊ होईल परवड रं
नको येऊ होईल परवड

जीळया जिन्याचा नवखा नखरा रं
शिळ्या शेंगाचा ताजा इकरा
जीळया जिन्याचा नवखा नखरा
नको भवताली घालूस चकरा रं
नको भवताली घालूस चकरा
तिच्या हसण्यात दडलं रडं
तिच्या हसण्यात दडलं रडं
उगं वाटोळं मागं पुढं
जिना अवघड
नको येऊ होईल परवड रं
नको येऊ होईल परवड

एका घटकेची होईल मज्जा
पुऱ्या जन्माची पुढती सजा
एका घटकेची होईल मज्जा
नीट मुठीत धर काळजा
नाका पुढं चाल जा थडं रं
नाका पुढं चाल जा थडं
तुझ्या घरी सुखाचं घडं
जिना अवघड
नको येऊ होईल परवड रं
नको येऊ होईल परवड
हिरव्या माडीचा जिना अवघड गं बाई
हिरव्या माडीचा जिना अवघड
जिना अवघड
नको येऊ होईल परवड रं
नको येऊ होईल परवड रं
नको येऊ होईल परवड

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*